# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

**फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – 440 001 (म.रा.)**

दुरध्वनी क्र. 0712–2511784 विस्तारीत क्र. 2049/2050 फॅक्स क्र. 0712 – 2511273

**Website : www.mafsu.in**

## प्रवेशपुर्व अधिसुचना

## (पशुवैद्यक पदवी अभ्यासक्रम प्रवेश 2017 –18)

विद्यापीठाअंतर्गत बी.व्ही.एस्सी. ॲन्ड ए.एच. पदवी अभ्यासक्रमासाठी 2017–18 या शैक्षणीक वर्षात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना कळविण्यात येते की, सदर प्रवेशासाठी उमेदवाराने सी.बी.एस.ई., नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यांत येणाऱ्या **NEET (UG) - 2017** या सामाईक प्रवेश परीक्षेस बसणे आवश्यक आहे. सदर परिक्षा **दिनांक 07 मे, 2017 (रविवार)** रोजी घेण्यात येणार आहे.

पशुवैद्यकीय पदवी प्रवेशाकरीता उमेदवार 12 वी (10 + 2) परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि इंग्रजी विषयात एकत्रीतपणे खुल्या प्रवर्गाकरीता किमान 50% गुण व आरक्षित प्रवर्गाकरीता किमान 47.5% गुण घेवून उत्तीर्ण असणे आवश्यक असुन उमेदवाराने सी.बी.एस.ई., नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणारी पात्रता व प्रवेश परीक्षा **NEET (UG) - 2017** दिलेली असणे अनिवार्य आहे.

बी.व्ही.एस्सी.ॲन्ड ए.एच. पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश (गोवा राज्य / जम्मू आणि काश्मीर येथील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागांसहीत) उमेदवाराच्या **NEET (UG) - 2017** हया परीक्षेतील गुणवत्तेनुसार करण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. अनिवासी भारतीय /विदेशी निवासी /भारतीय वंशाचे नागरीक असणारे उमेदवार 12 वी किंवा समकक्ष परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि इंग्रजी विषय घेवून भारतातून उत्तीर्ण झाले असल्यास त्यांना **NEET (UG) - 2017** ही परीक्षा देणे अनिवार्य आहे, तथापि असे उमेदवार 12 वी किंवा समकक्ष परीक्षा परदेशातून उत्तीर्ण झालेले असल्यास त्यांना **NEET (UG) - 2017** ही परीक्षा देणे बंधनकारक राहणार नाही.

प्रवेश परीक्षेच्या विस्तृत माहितीसाठी उमेदवारांनी www.cbseneet.nic.in हया संकेतस्थळाला भेट दयावी.

बी.व्ही.एस्सी. ॲन्ड ए.एच. प्रवेश प्रक्रियेबाबतची विस्तृत अधिसुचना विद्यापीठातर्फे यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

**दिनांक : 11/02/2017**

कुलसचिव